सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, १, बी.जे. रोड, पुणे-०१
दूरध्वनी क्र. ०२०- २६१२२८४६
Email:- agricredit16@gmail.com

जा.क्र./कृषीपत-8/डॉपंदेव्यासयो/निधी वितरण-1/2025 /1898

दिनांक :- 14 /08/2025

## निधी वितरण आदेश

**विषय :- डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना (सर्वसाधारण) (2425 1009)**
**शासन निर्णय दि. 02/07/2024 नुसार प्राप्त निधी वितरण आदेश.**

संदर्भ :- 1. शासन निर्णय क्र. अर्थसं 0525/प्र.क्र.114/18-स, दि. 12/08/2025

राज्यातील शेतक-यांनी बँकांकडून घेतलेल्या अल्पमुदती पीक कर्जाची परतफेड विहीत मुदतीत होण्यासाठी शेतक-यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने राज्य शासनाने दि. 24/11/1988 व दि. 02/11/1991 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे व्याज सवलत योजना अमलात आणली आहे. सदर योजना डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना या नावाने अमलात असून या योजनेतंर्गत ज्या शेतक-यांनी बँकांकडून पीक कर्ज घेऊन सदर कर्जाची परतफेड प्रतिवर्षी 30 जून पर्यंत केली आहे अशा शेतक-यांना राज्य शासनामार्फत रुपये तीन लाखापर्यतच्या कर्जासाठी तीन टक्के दराने व्याज सवलत अनुदान देण्यात येत आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना (सर्वसाधारण) (2425 1009) या योजनेसाठी सन 2025-26 वर्षामध्ये अर्थसंकल्पीत तरतुद रू. 500 कोटी (रु. पाचशे कोटी फक्त) मंजूर आहे. संदर्भिय शासन निर्णय दि. 12/08/2025 अन्वये शासनाकडून रक्कम रु. 60 कोटी वितरणासाठी प्राप्त झाली आहे. सदर प्राप्त निधीचे वितरण जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या मागणीप्रमाणे खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा उपनिबंधक | वितरीत करावयाचा निधी रक्कम रुपये | अक्षरी रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | 8326000 | रुपये त्र्याऐंशी लाख सव्वीस हजार फक्त |
| 2 | सिंधुदूर्ग | 1450000 | रुपये चौदा लाख पन्नास हजार फक्त |
| 3 | नाशिक | 78895000 | रुपये सात कोटी अठठयाऐंशी लाख पंच्यानऊ हजार फक्त |
| 4 | पुणे ग्रामीण | 99623051 | रुपये नऊ कोटी शहानाऊ लाख तेवीस हजार एक्कावन फक्त |
| 5 | कोल्हापूर | 50000000 | रुपये पाच कोटी फक्त |
| 6 | सांगली | 25619973 | रुपये दोन कोटी छप्पन्न लाख एकोणीस हजार नऊशे त्र्याहत्तर फक्त |
| 5 | सातारा | 40000000 | रुपये चार कोटी फक्त |
| 6 | परभणी | 16902401 | रुपये एक कोटी एकोणसत्तर लाख दोन हजार चारशे एक फक्त |
| 7 | लातूर | 66010424 | रुपये सहा कोटी साठ लाख दहा हजार चारशे चोवीस फक्त |
| 8 | नांदेड | 29998000 | रुपये दोन कोटी नव्यानऊ लाख अठयानऊ हजार फक्त |
| 9 | अमरावती | 23641000 | रुपये दोन कोटी छत्तीस लाख एक्केचाळीस हजार फक्त |
| 10 | अकोला | 81111000 | रुपये आठ कोटी आकरा लाख आकरा हजार फक्त |
| 11 | वाशिम | 78370151 | रुपये सात कोटी त्र्याऐंशी लाख सत्तर हजार एकशे एक्कावन फक्त |
| 12 | धुळे | 53000 | रुपये त्रेपन्न हजार फक्त |
| एकूण रुपये | | 60,00,00,000 | **रुपये साठ कोटी फक्त** |

सदर योजनेवर होणारा खर्च सन 2025-26 या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतुदीमधून भागविण्यात यावा व तो पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र.व्ही -2

मुख्यलेखाशिर्ष – 2425 सहकार

107 सहकारी पतसंस्थाना सहाय्य (02) व्याजात सवलत

(02)(04) डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

(कार्यक्रम)(दत्तमत) (2425 1009)

33- अर्थसहाय्य

संबंधीत आहरण व संवितरण अधिका-यांना कळविण्यात येते की, सदर निधीचा विनियोग करताना उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयामध्ये तसेच या कार्यालयामार्फत निर्गमित केलेली परिपत्रके व मार्गदर्शक सूचनांमधील विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.

(दिपक तावरे, भा.प्र.से.)
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे,**

**प्रति :-**

1.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व संबंधित) (शासन निर्णयाच्या प्रतीसह) त्यांना कळविण्यात येते की,

I) उक्त प्रमाणे वितरित निधी खर्च करताना प्राधान्याने जुने प्रलंबित प्रस्ताव निकाली काढावेत.

II) सदर योजनेवर झालेला **खर्च व लाभार्थी संख्या** याची माहिती नियोजन विभागाच्या योजना माहिती प्रणालीमध्ये (MPSIMS) भरावयाची असल्याने वितरित निधी खर्च झाल्यानंतर त्याबाबतची माहिती या कार्यालयाकडे सादर करावी.

III) सदर तरतूद खर्चाचे **उपयोगिता प्रमाणपत्र** संबंधित कोषागार कार्यालयास/महालेखापाल कार्यालयास सादर करावे.

IV) सदर प्रमाणे वितरित रक्कम खर्च होणार नसल्यास त्याबाबत दुरध्वनीद्वारे / ई-मेलद्वारे या कार्यालयास अवगत करावे, जेणेकरुन तरतूदीचे फेरवितरण अन्य जिल्हयांना करता येईल याची नोंद घ्यावी.

2. कार्यासन अधिकारी, अंदाज व नियोजन, मुख्यालय पुणे यांना कळविण्यात येते की, उक्त नमुद केल्याप्रमाणे योजने अंतर्गत प्राप्त निधी संबंधीत जिल्हयांना अंदाजपत्रकीय वितरण प्रणालीव्दारा वर्ग करण्यांत यावा.

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:-**

1 विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व-मुंबई वगळून)
उक्त प्रमाणे वितरीत करण्यांत आलेली रक्कम खर्च होईल याची दक्षता घेण्याबाबत तसेच जिल्हा उपनिबंधक कार्यालयांकडील जिल्हानिहाय खर्च व लाभार्थी संख्या याची माहिती संकलित करून या कार्यालयांस विहीत प्रपत्रात सादर करण्याची कार्यवाही करावी.

2 जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व संबंधित जिल्हे)

**प्रत माहितीस्तव सादर :-**

1. मा.महालेखापाल, कार्यालय मुंबई/नागपूर.

(दिपक तावरे, भा.प्र.से)
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे,**